# पुणे विद्यापीठ

दूरध्वनी क्रमांक :
०२०-२५६९१२३३
२५६०१२५७
२५६०१२५८
२५६०१२५९

शैक्षणिक विभाग
गणेशखिंड, पुणे-४११००७.
टेलिग्राफ : 'युनिपुणे'
फॅक्स : ०२०-२५६९१२३३
वेबसाइट : www.unipune.ernet.in
इ-मेल : dyracademic@unipune.ernet.in

संदर्भ क्र. ॲफि/३६२२

दिनांक : २१/०/२०१०

प्रति,
मा. अध्यक्ष/सचिव,
आर्ट डेव्हलपमेंट अ‍ॅकेडमि,फ्लॅट नं.३३,
सिध्दीप्रसाद को –ऑप हौसिंग सोसायटी पौड रोड,
४७/७ एरंडवणे, पुणे.

विषय : शैक्षणिक वर्ष २०१०–११ या एका वर्षाकरिता नवीन महाविद्यालय सुरू करण्यास परवानगी देण्याबाबत.
संदर्भ : शासन निर्णय क्र. संकिर्ण –२०१०/(११५/१०)/तांशि–४ दि. १५ जून, २०१०

महोदय,
वरील विषयाच्या संदर्भात प्राप्त झालेल्या आदेशानुसार आपणास कळविण्यात येते की, आपल्या संस्थेच्या वरील महाविद्यालयास शैक्षणिक वर्ष २०१०–११ या एका वर्षाकरिता प्रथम वर्ष बी.आर्च. (४० प्रवेश क्षमता)या अभ्यासक्रमांचे नवीन महाविद्यालय मिनर्व्हा कॉलेज ऑफ आर्किटेक्चर अबी,ता. मावळ, जि.पुणे. येथे कायम विना अनुदान तत्त्वावर सुरू करण्यास अहवालातील अटी व शर्तींची पूर्तता विद्यापीठाचे पत्र निर्गमित झाल्यापासून तीन महिन्यांच्या आत पूर्ण करण्याच्या अटीवर परवानगी देण्यात येत आहे.

महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम ८१ मधील तरतुदींच्या अधिन राहून व पुणे विद्यापीठ अध्यादेश १७१ प्रमाणे बँकेत ठेव ठेवणे महाविद्यालयावर बंधनकारक आहे. त्याचप्रमाणे नवीन महाविद्यालय सुरू करताना वास्तुशास्त्र परिषद नवी दिल्ली/महाराष्ट्र शासन/विद्यापीठ नियमानुसार आवश्यक प्राचार्य, शिक्षक व शिक्षकेतर सेवकांची नियुक्ती करणे महाविद्यालयावर बंधनकारक राहतील. तसेच पुणे विद्यापीठ व महाराष्ट्र शासनाद्वारे वेळोवेळी अस्तित्वात येणारे नियम आपणास बंधनकारक राहतील, याची नोंद घ्यावी.

आपल्या महाविद्यालयाचा आय.डी. नंबर **(Id.No. PU/PN/Arch./398/2010)** असा आहे.

कळावे,

आपला विश्वासू,

उपकुलसचिव
(शैक्षणिक विभाग)

सोबत : अहवाल.